राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील
माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८ अन्वये प्राप्त तक्रार.

क्र. रामाआ-तक्रार केस १६/२०१७/सांगली
राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधान भवना समोर, पुणे - १

श्री. प्रशांत मधुकर चव्हाण — अर्जदार

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक,
उप अधिक्षक भुमि अभिलेख, मिरज कार्यालय,
राजवाडा परिसर, जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या पुर्वेस,
सांगली — उत्तरवादी

प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप अधिक्षक भुमि अभिलेख,
उप अधिक्षक भुमि अभिलेख, मिरज कार्यालय,
राजवाडा परिसर, जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या पुर्वेस,
सांगली

सुनावणी दिनांक:- १६.०९.२०२१

अर्जदार यांनी दि. १०/०३/२०१७ रोजी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचेकडे तक्रार अर्ज दाखल केला होता.

प्रस्तुत तक्रार अर्जाच्या अनुषंगाने आयोगाने सर्व संबंधितांना Email/Whats Appद्वारे सुनावणीचे सूचना पत्र पाठवून संबंधितांनी Google Meet या व्हिडीओ कॉन्फरंन्स माध्यमाद्वारे सुनावणीस उपस्थित रहावे, असे कळविले.

त्यानुसार सुनावणीस अर्जदार व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित होते.

सुनावणीचे वेळी अर्जदार यांनी असे कथन केले की, “माझा तक्रार अर्ज दि. १०/०३/२०१७ रोजीचा असून त्यामध्ये माहिती अर्ज व प्रथम अपिल अर्जावर कोणतीही कारवाई होत नसल्याने संबंधितांची चौकशी होऊन प्रशासकीय कारवाई व्हावी अशी तक्रार केलेली आहे. तसेच पुरामध्ये माझे सर्व पेपर्स खराब झाले असल्यामुळे माझ्याकडे पुरेसे कागदपत्रे नाहीत. माझ्या अर्जामध्ये जे नमूद केलेले आहे ते म्हणणे विचारात घेऊन निर्णय देण्यात यावा.”

सदर प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे व युक्तिवादावरून असे दिसून येते की, १) आयोगाने व्दितीय अपिल क्र. १२७८/२०१७ मध्ये दिलेल्या दि. ०९/०७/२०१९ रोजीच्या आदेशात अपिलार्थीस अवलोकनाची संधी देऊन माहिती पुरविण्याचे आदेश निर्गमीत केले होते. सदर आदेशाची अमंलबजावणी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भूमि अभिलेख, मिरज ता. मिरज जिल्हा सांगली यांनी केली किंवा कसे याबाबतचा कोणताही पुरावा आयोगासमोर आलेला नाही. आयोगाच्या आदेशाची अंमलतजावणी न करणे ही अतिशय गंभीर बाब असून ती दंडात्मक कारवाईस पात्र ठरणारी आहे.

प्रस्तुत प्रकरणात जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधीक्षक भूमि अभिलेख, मिरज ता. मिरज जिल्हा सांगली यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी केली नसल्याचे दिसून येत असल्याने त्यांच्याकडून अधिनियमाच्या कलम ७(१) चा भंग झाला असल्याचे दिसून येत असल्याने ते दंडात्मक कारवाईस सकृतदर्शनी पात्र ठरतात. सबब, आयोगाचे आदेश खालील प्रमाणे आहेत.

## आदेश

संबंधित जन माहिती अधिकारी तथा तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख, मिरज कार्यालय, राजवाडा परिसर, जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या पुर्वेस, सांगली श्री. सतिश चव्हाण यांनी आयोगाच्या आदेशाची अंमलबजवणी न करुन

अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचे विरुद्ध कलम २० मध्ये नमुद तरतूदीनुसार दंडात्मक कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांच्या आत आयोगास सादर करावा. मुदतीत खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहीत धरून त्यांचे विरुद्ध कलम २० नुसार कार्यवाही अंतिम करण्यात येईल.

प्रस्तुतचा तक्रार अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(दिलीप ल. धारूरकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ, पुणे

जावक क्र. 611/2022/सांगली दिनांक - 29/4/22

<u>प्रतिलिपी-माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित-</u>

१. जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली.

२. संबंधित जन माहिती अधिकारी तथा तथा मुख्यालय सहाय्यक, उप अधिक्षक भुमि अभिलेख, मिरज कार्यालय, राजवाडा परिसर, जिल्हा अधिकारी कार्यालयाच्या पुर्वेस, सांगली श्री. सतिश चव्हाण यांना जिल्हा अधीक्षक, भूमि अभिलेख, सांगली यांचे मार्फत (नोंदणीकृत टपालाद्वारे)- सदरचा आदेश संबंधितांस बजावून त्याची पोच आयोगास सादर करावी.